RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2013-15

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष ५, अंक ४७] मंगळवार, जुलै २३, २०१३/श्रावण १, शके १९३५ [पृष्ठे ७, किंमत : रुपये २५.००

**असाधारण क्रमांक ९८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० जुलै २०१३.

**अधिसूचना**

**वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२.**

क्रमांक डब्ल्युएलपी-०६१३/प्र.क्र. १९९/फ-१. - वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ (१९७२ चा अधिनियम क्रमांक ५३) याच्या कलम ४, पोट-कलम (१), खंड (क) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि या बाबतीत, वेळोवेळी काढण्यात आलेल्या यापूर्वीच्या सर्व अधिसूचना व आदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याव्दारे, महाराष्ट्र राज्याकरिता, मुख्य वन्यजीव रक्षक म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य यांची नियुक्ती करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

डॉ. यु. एम. फारूकी,
शासनाचे सह सचिव.

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated 20th July 2013.

*NOTIFICATION*

WILD LIFE (PROTECTION) ACT, 1972.

No. WLP-0613/CR-199/F-1.– In exercise of the powers conferred by clause *(a)* of sub-section *(1)* of section 4 of the Wild Life (Protection) Act, 1972 (No. 53 of 1972), in its application to the State of Maharashtra, and in supersession of all previous Notifications and Orders, issued from time to time, in this behalf, the Government of Maharashtra is hereby pleased to appoint the Principal Chief Conservator of Forests (Wildlife), Maharashtra State, as the Chief Wild Life Warden for the State of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. U. M. FAROOQUI,
Joint Secretary to Government.

## महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ जुलै २०१३.

## अधिसूचना

वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२.

क्रमांक डब्ल्यूएलपी-०६१३/प्र.क्र.१९९/फ-१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ (१९७२ चा अधिनियम क्रमांक ५३) (त्यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ४, पोट-कलम (१), खंड (ख) व (ग) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, शासकीय आदेश, महसूल व वन विभाग, क्र. डब्ल्यूएलपी-१०७७/८६८५४-फ-१, दिनांक ५ मे १९७७ अनुसार अपर मुख्य वन्यजीव रक्षक, उप मुख्य वन्यजीव रक्षक, वन्यजीव रक्षक व सहायक वन्यजीव रक्षक यांची नियुक्ती केली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम ५४ च्या प्रयोजनार्थ शासकीय अधिसूचना महसूल व वन विभाग, क्र.डब्ल्यूएलपी-१०७७/८६८५४-फ-१, दिनांक ५ मे १९७७ अनुसार मुख्य वन्यजीव रक्षक, अपर मुख्य वन्यजीव रक्षक व उप मुख्य वन्यजीव रक्षक यांना अधिकार प्रदान केले आहेत ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम ५५ खंड (ख) च्या प्रयोजनार्थ शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र.डब्ल्यूएलपी-१०९७ /प्र.क्र.१२१/फ-१, दिनांक २६ सप्टेंबर २००१ यानुसार मुख्य वन्यजीव रक्षक यांच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी, राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात (वाशिम व नंदूरबार वगळता) मानद वन्यजीव रक्षक यांना प्राधिकृत केले आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने शासकीय आदेश, महसूल व वन विभाग, क्र. डब्ल्यूएलपी-१००३/प्र.क्र.८९/फ-१, दिनांक २३ फेब्रुवारी २००४ यानुसार उक्त अधिनियमाच्या प्रकरण सहा-क मधील सक्षम प्राधिकाऱ्याची कार्ये पार पाडण्यासाठी विवक्षित अधिकाऱ्यांना प्राधिकृत केले आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र.डब्ल्यूएलपी-१००३/प्र.क्र.८९/फ-१, दिनांक २३ फेब्रुवारी २००४ यानुसार उक्त अधिनियमाच्या कलम ५०, पोट-कलम (८), खंड (क) ते (घ) मधील अधिकारांचा वापर करण्यासाठी सर्व अपर मुख्य वन्यजीव रक्षक, उप मुख्य वन्यजीव रक्षक व वन्यजीव रक्षकांना प्राधिकृत केले आहे ;

आणि ज्याअर्थी, वन विभाग तसेच महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यांच्या संघटनात्मक संरचनेतील झालेला बदल आणि त्यानुषंगाने विविध पदांची झालेली श्रेणीवाढ आणि परिणाम स्वरूप उक्त अधिनियमाच्या प्रयोजनार्थ वेळोवेळी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांच्या विवक्षित पदांच्या पदनामांमध्ये झालेला बदल विचारात घेता, या अधिकाऱ्यांना नियुक्त करण्यासाठी, अधिकार प्रदान करण्यासाठी व विविध प्रयोजनार्थ प्राधिकृत करण्यासाठी अधिसूचना निर्गमित करणे इष्ट आहे ;

त्याअर्थी, आता, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ (१९७२ चा अधिनियम क्रमांक ५३) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, कलम ४ चे पोट-कलम (१), कलम ३९ चे पोट-कलम २, कलम ५० चे पोट-कलम (८), कलम ५४, कलम ५५ चे खंड(ख), कलम ५८ घ, ५८ छ आणि ६० ख यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि त्या बाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून आणि या बाबतीत वेळोवेळी काढण्यात आलेल्या वर नमूद केलेल्या सर्व अधिसूचना व आदेशांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन याव्दारे,—

(एक) खाली दिलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे वन विभाग व महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित या संघटनेमध्ये पुढील अधिकाऱ्यांची त्यांच्या प्रादेशिक अधिकार क्षेत्रासाठी वन्यजीव रक्षक म्हणून नियुक्ती करीत आहे :—

### अनुसूची

| अनुक्रमांक (१) | संघटना (२) | अधिकारी (३) |
|---|---|---|
| १ | वन विभाग | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), मुख्य वनसंरक्षक, व्याघ्र प्रकल्पांचे क्षेत्र संचालक, वनसंरक्षक, उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील उप संचालक, स्वतंत्र उप विभागांचे उप विभागीय वन अधिकारी, सहायक वनसंरक्षक, वन परिक्षेत्र अधिकारी, वनपाल व वनरक्षक. |
| २ | महाराष्ट्र वन विकास महामंडळ, मर्यादित. | महाव्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक, विभागीय व्यवस्थापक, सहायक व्यवस्थापक, वन परिक्षेत्र अधिकारी, वनपाल व वनरक्षक. |

**स्पष्टीकरण.—** वरील अनुसूचीमधील अनुक्रमांक १ समोरील स्तंभ (३) मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांमध्ये वन विभागाच्या प्रादेशिक व वन्यजीव अशा दोन्ही शाखांमधील अधिकाऱ्यांचा समावेश असेल. उदा. मुख्य वनसंरक्षक यामध्ये मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) याचा समावेश आहे.

(दोन ) खाली दिलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या वन विभाग, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, मर्यादित या संघटनेमधील अधिकाऱ्यांना व पोलीस अधिकाऱ्यांना स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या उक्त अधिनियमाच्या विविध कलमांच्या प्रयोजनार्थ, नियुक्त करीत आहे, त्यांना अधिकार प्रदान करीत आहे व प्राधिकृत करीत आहे :—

अनुसूची

| अनुक्रमांक | अधिकारी | कलमे |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | (एक) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), व्याघ्र प्रकल्पांचे क्षेत्र संचालक, मुख्य वनसंरक्षक, वनसंरक्षक, उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील उप संचालक, स्वतंत्र उपविभागांचे उपविभागीय वन अधिकारी, सहायक वनसंरक्षक व वन परिक्षेत्र अधिकारी.<br>(दोन) महाराष्ट्र वन विकास महामंडळ, मर्यादित यांचे महाव्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक आणि विभागीय व्यवस्थापक. | ३९ (२) |
| २ | (एक) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), व्याघ्र प्रकल्पांचे क्षेत्र संचालक, मुख्य वनसंरक्षक, वनसंरक्षक, उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील उप संचालक, स्वतंत्र उपविभागांचे उपविभागीय वन अधिकारी आणि सहायक वनसंरक्षक<br>(दोन) महाराष्ट्र वन विकास महामंडळ, मर्यादित यांचे महाव्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक, विभागीय व्यवस्थापक व सहायक व्यवस्थापक. | ५० (८) |
| ३ | (एक) मुख्य वन्यजीव रक्षक, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), व्याघ्र प्रकल्पांचे क्षेत्र संचालक, मुख्य वनसंरक्षक, वनसंरक्षक व उप वनसंरक्षक.<br>(दोन) महाराष्ट्र वन विकास महामंडळ, मर्यादितचे महाव्यवस्थापक व प्रादेशिक व्यवस्थापक. | ५४ |
| ४ | पोलीस उप निरीक्षक या दर्जापेक्षा खाली नसलेला पोलीस अधिकारी. | ५५ (ख) |
| ५ | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), व्याघ्र प्रकल्पांचे क्षेत्र संचालक, मुख्य वनसंरक्षक. | ५८ घ |
| ६ | मुख्य वन्यजीव रक्षक, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), व्याघ्र प्रकल्पांचे क्षेत्र संचालक, मुख्य वनसंरक्षक व वनसंरक्षक. | ५८ छ |
| ७ | मुख्य वन्यजीव रक्षक | ६० ख |

**स्पष्टीकरण (१).---** वरील अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांमध्ये वन विभागाच्या प्रादेशिक व वन्यजीव या दोन्ही शाखांमधील अधिकाऱ्यांचा समावेश असेल. उदा. मुख्य वनसंरक्षक यामध्ये मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) याचा समावेश आहे.

**स्पष्टीकरण (२).---** या अधिसूचनेद्वारे अधिक्रमण करण्यात आलेल्या आणि उक्त अधिनियमाच्या तरतुदींखाली काढलेल्या कोणत्याही अधिसूचनांद्वारे किंवा आदेशांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून कोणत्याही अधिकाऱ्याने केलेल्या कायदेशीर कार्यवाहीच्या परिणामी, जी कोणतीही कार्यवाही सुरू असेल, अशा कोणत्याही कार्यवाहीवर, या अधिसूचनेतील कोणत्याही गोष्टीमुळे बाधा पोहोचणार नाही किंवा ती कार्यवाही संकोच पावणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. यु. एम. फारूकी,**
शासनाचे सह सचिव.